# मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे कक्ष

३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर –०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- २०१/२०२२ दिनांक :- ०२/०७/२०२२

# चुकीच्या बँक खात्यामध्ये वळती झालेली रक्कम ०७ लाख रुपये सायबर गुन्हे कक्षाकडून परत मिळविण्यात यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत मिरारोड पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे तक्रारदार सौ.पुनम समीर खान, वय – ३८ वर्षे, गृहीणी, राहणार - बी/१०४,ओम प्रसाद को-ऑप हौ सोसायटी मिरारोड (पुर्व) येथे राहणाऱ्या महिला तक्रारदार यांना त्यांचे नातेवाईकांना ०७ लाख रुपये रक्कम पाठवायची होती. ती रक्कम त्यांनी दिनांक २९/०६/२०२२ रोजी त्यांची फेडरल बँक मिरारोड या शाखेत जावून पावती भरुन त्यांचे नातेवाईकांना पाठविली. त्यानंतर त्यांनी संबधित नातेवाईकांना ०७ लाख रुपये रक्कम पाठविल्याबाबतची माहिती दिली. त्यांचे नातेवाईकांनी रक्कम प्राप्त झालेली नसल्याचे कळविले. त्यामूळे तक्रारदार यांनी पुन्हा बँकेत जावून चौकशी केली असता त्यांचेकडून नजरचुकीने अकाऊंट क्रमांकामधील एक नंबर चूकीचा टाकला गेल्याने सदरची रक्कम चुकीच्या बँक खात्यावर जमा झाली होती.

सदरची बाब तक्रारदार यांचे लक्षात येताच त्यांनी तात्काळ फेडरल बँकेला समक्ष भेट देवून व्यवहार रद्द करुन रक्कम परत मिळणेची विनंती केली. परंतू फेडरल बँक मॅनेजर यांनी त्यांना ***"ही रक्कम तूम्ही स्वत: पाठविलेली असल्याने परत मिळू शकत नाही"*** असे कळविले. त्यानंतर तक्रारदार हया सायबर गुन्हे कक्ष येथे आले व त्यांनी वरील सर्व हकीकत सांगितली व तक्रारी अर्ज दिला.

**(सायबर गुन्हे कक्ष आवक अर्ज क्रमांक ९५३-बी/२०२२ दिनांक ३०/०६/२०२२)**

नमूद तक्रारीबाबत सायबर गुन्हे कक्ष यांनी तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांनी पाठविलेल्या ०७ लाख रुपये रक्कमेच्या बँक खात्याची माहिती तांत्रीक विश्लेषण करुन प्राप्त केली. त्यामध्ये सदरची रक्कम ही **XXXX पटेल** यांचे युनीयन बँक ऑफ इंडीया, मुंबई यांचे खात्यावर जमा झाली होती. तसेच संबधित बँकेला संपर्क करुन अधिक माहिती घेतली असता नमूद रक्कम ही **XXXX पटेल** यांचे युनीयन बँक ऑफ इंडीयाचे बँक खात्यावर वळती झाल्याचे बँकेकडून कळविण्यात आले.

युनीयन बँकेसोबत पत्रव्यवहार करुन संबधित बँकेचे स्टेटमेंट,केवायसी,संपर्क क्रमांक अशी माहिती प्राप्त करण्यात आली. त्यातील माहितीचे अवलोकन केले असता सदरची रक्कम **XXXX** पटेल यांचे बँक खात्यामध्ये दिसून आली. नमूद खातेधारक यांना संपर्क साधून चौकशी केली असता ***"मला लॉटरी लागल्याने ०७ लाख रुपये रक्कम माझ्या खात्यावर आलेली आहे."*** असे सांगण्यात आले. सदरच्या रक्कमसंदर्भात त्यांना सविस्तर हकीकत सांगण्यात आली व नमूद रक्कम तक्रारदार यांना परत करण्याबाबत विनंती करण्यात आली अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी समज देण्यात आली. त्यावरुन आज दिनांक ०२/०७/२०२२ रोजी नमूद बँक खातेधारक **XXXX पटेल** यांनी तक्रारदार पुनम समीर खान यांची ०७ लाख रुपये रक्कम त्यांचे मूळ खात्यावर वर्ग केली आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **आपली रक्कम कोणालाही पाठविण्यापूर्वी बँक खाते व इतर तपशील खात्रीपूर्वक तपासून घ्यावा.**

सदरची कामगिरी विजयकांत सागर,पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोलीस अंमलदार/१२०९२ प्रविण आव्हाड, पोलीस अंमलदार/१२०९५ गणेश इलग, महीला पोलीस अंमलदार/ १२००७ माधूरी धिंडे , महिला पोलीस अंमलदार/१६१०६ सुवर्णा माळी, महीला पोलीस अंमलदार/१३१०४ पल्लवी निकम, म.सु.ब.आकाश बोरसे यांनी पार पाडली आहे.

**----0000----**